'रिअल इस्टेटसाठी मुंबई फायदेशीर बाजारपेठ'

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

रिअल इस्टेट विकासासाठी भारतातील सर्वात फायदेशीर ठिकाण म्हणून मुंबई रिअल इस्टेटच्या बाजारपेठेत वेगाने आपले स्थान मजबूत करत आहे. सन २०३० पर्यंत या बाजारपेठेत सुमारे ४० टक्के शहराचा वाटा मुंबईचा असेल असा अंदाज आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे सुरू झालेल्या तीन दिवसांच्या मेगा होमथॉन २०२५ प्रॉपर्टी एक्स्पोच्या चौथ्या आवृत्तीमध्ये 'रिअल इस्टेट फोरम २०२५' मध्ये सहभागी उद्योजकांनी यासंदर्भात विश्वास व्यक्त केला.

कर्ज आणि बांधकाम क्षेत्राच्या वित्तपुरवठा गरजांवर 'फायनान्सिंग ग्रोथः न्यू - एज कॅपिटल फॉर अ न्यू महाराष्ट्र' या चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यासंदर्भात मुंबईच्या आर्थिक परिवर्तनाचा आढावा स्टँडर्ड चार्टर्ड बँकेचे कमर्शियल रिअल इस्टेट वित्तपुरवठा, दक्षिण आशिया शाखेचे व्यवस्थापकीय संचालक आणि प्रमुख मनमीत गुलाटी यांनी घेतला. मुंबईचा जीडीपी नॉर्वेच्या जीडीपीपेक्षा अधिक आहे. या शहरी केंद्रांच्या जलद वाढीमुळे या मागणीतील वाढ अनुभवत असल्याचे ते म्हणाले. या एक्स्पोमध्ये मुंबईच्या भविष्याबद्दलही चर्चा घडवण्यात आली. मुंबईच्या पायाभूत सुविधांची गरज, वाढती लोकसंख्या यावर या सत्रात भाष्य करण्यात आले. यावेळी लब्धी लाइफस्टाइलचे मुख्य कार्यकारी अधिकारी व नरेडको महाराष्ट्र नेक्स्टजेनचे अध्यक्ष विकास जैन यांनीही बाजारातील बदलत्या प्रवाहांचा वेध घेतला. होमथॉन २०२५ एक्स्पोच्या दुसऱ्या दिवशी रिअल इस्टेट क्षेत्र कसे भरभराटीला येत आहे याचेही विवेचन करण्यात आले.